# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 02/03/2021 (मंगळवार)

(दुपार)

---

### फसवणुक

1) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 34 कि मी अंतरावर मौजा खापा खुर्द शिवार येथे दि. 01.07.2016 ते दि. 01.03.2021 पावेतो आरोपी 1) मो क 9545814661 चा धारक 2) सी एच पाटील वनपरिक्षेत्र अधिकारी वन विभाग हिंगणा, 3) रावसाहेब (संबंधित अधिकारी वन विभाग हिंगणा), 4) तथाकथीत आशादेवी पुरूषोत्तम अग्रवाल(मुळ ओळखपत्रात फोटोमध्ये दर्शविलेली महिला जे कागदपत्र वनविभाग कार्यालय यांचे फाईल मध्ये जमा आहे.), 5) पिन्टु मडावी, 6) ज्ञानेश्वर कुंभरे, 7) निळकंठ बलदेव जाधव रा. आगरगाव तांडा, त हिंगणा जि नागपुर, 8) देवीदास वासुदेव मसराम वय 43 वर्ष रा. येरणगाव ता हिंगणा जि नागपुर, 9) ए. आर शेख क्षेत्र पर्यवेक्षक अडेगाव(माहे जानेवारी 2016 ते जुलै 2016) त हिंगणा जि नागपुर, 10) आर सी शेंडे वनरक्षक देवळी काळबांडे, त हिंगणा जि नागपुर, 11) नायब तहसिलदार हिंगणा त हिंगणा जि नागपुर(माहे जानेवारी 2016 ते जुलै 2016), 12) तलाठी मौजा सा.क्र 55 देवळी काळबांडे त हिंगणा व 13) मो.सा. क्र एमएच–31 एम–7459 चा मालक इंदर राठोड, रा. दाभा येरणगाव ता हिंगणा जि नागपुर व त्याचे संबंधीत वाहन चालक, 14) ट्रॅक्टर क्र एमएच–40 एपी–2019 आणि ट्रॉली क्र एमएच–31 एजी–4584 चे मालक कमलाकर पंजाबराव वानखेडे वार्ड क्र 2, सुरादेवी कोराडी नागपुर व त्यांचे संबंधीत वाहन चालक, 15) उप अधिक्षक भुमी अभिलेख हिंगणा तहसिल कार्यालय परिसर हिंगणा, जि. नागपूर यांनी स्वतःहाच्या आर्थिक फायदयासाठी फिर्यादी नामे– सौ आशादेवी पुरूषोत्तम अग्रवाल, वय 69 वर्ष, रा मारवाडी चाळ इम्प्रेस मिल रोड संत्रा मार्केट नागपुर यांचा स्वताहःच्या मालकीच्या शेतातील 350 नग सागाचा झाडाचा विक्रीसाठी फौजदारीपात्र कट करून खोटी व्यक्ती खोटी कागदपत्रे सादर करून झाडे कटाइची परवानगी मिळवुन तसेच परवानगी न मिळवता 154 घन मिटर लाकुड कापुन फिर्यादीची बाजारभाव प्रमाणे 1 कोटी रु. ची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीतांविरुध्द कलम 379, 420, 421, 467, 468, 471, 120 बी, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. राम ढगे पो स्टे कोंढाळी मो नं 9518979499 हे करीत आहे.

2) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत अर्धा फर्लांग अंतरावर बुटाबोरी आयसीआयसीआय बॅक येथे 18/03/2019 ते 14/01/2021 पर्यत फिर्यादी नामे– काशीराम गोपालसिंग राजपुरोहीत, वय 31 वर्ष, रा प्लॅट नं 508 रतन अपार्टमेंन्ट नं 02 आग्याराम देवी रोड गणेशपेठ नागपुर हे मारूती एअर कुरीअर ॲन्ड कारगो प्रा.लि कंपनीचे नागपुर व विदर्भ चे अधिकृत डिस्टीब्युटर असुन फिर्यादी चे ऑफीस नागपुर येथे आहे. फिर्यादी यांचे कंपनीत मागील पाच वर्षा पासुन आरोपी नामे– भागीरथ राम दुलाराम नेहरा वय 24 वर्ष, रा ढंढेरू (भामुवान), ता रतनगड जिल्हा चुरू (राजस्थान), ह.मु प्लॅट अ नं 508 रतन अपार्टमेंन्ट नं 02 आग्याराम देवी रोड गणेशपेठ नागपुर ऑफीस हा कुरीअर बॉय म्हणुन कामाला असंताना कंपनीमध्ये आलेले पार्सल तो दररोज बुटीबोरी एमआयडीसी येथील ग्राहक कंपनीत सोडुन परत पार्सल कंपनी मधुन प्राप्त करून ते फिर्यादीचे नागपुर येथील ऑफीस मध्ये नेण्या आण्याचे काम करीत असतांना ग्राहक कंपनीमध्ये फिर्यादीचे कंपनीचे नावाचे कुरीअर कामाचे बिलाचे चेक सुध्दा आरोपी कडे ग्राहक कंपण्याकडुन देण्याात येत होते. यातील आरोपीने त्याचा फायदा घेवुन मारूती एअर कुरीअर कंपनीचे नावाचे फिर्यादीस माहीती न

करता आयसीआयसीआय बॅक बुटीबोरी येथे बनावट कागदपत्रे व स्वतःचे ओळख संबंधी कागदपत्रे सादर करून दुसरे खाते उघडुन ग्राहक कंपनी कडुन फिर्यादीचे कंपनीला चेक व्दारे कामाचे देण्यात येणारे रूपये आरोपीने त्याचे उघडलेल्या बॅक खात्यामध्ये चेक व्दारे वळते करून एकुण 4,20,000/— रू तसेच फिर्यादीचे कुरीअर कंपनीचे कामाचे ग्राहकांकडून नगदी मिळालेले 95,000/— रूपये असे एकुण 5,15,000/— रूपये ची अफरातफर करून फिर्यादी व कंपनीचा विश्वासघात करून फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 420, 406, 464, 468 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. भारती मो क्र 9850974033 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर